REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# भंडारा जिल्ह्यातील बचत गटातील सहभागामुळे महिला सदस्यांच्या जीवनाच्या स्तरातील सुधारणा: एक समाजशास्त्रीय अध्ययन

डॉ. मीनाक्षी श्रीहरी बेसेकर
समाजशास्त्र विभागप्रमुख
श्रीमती गोपीकाबाई भुरे महिला महाविद्यालय, तुमसर, जिल्हा- भंडारा

## सारांश

बचत गट चळवळ ही अलीकडील काळातील सर्वात मोठी व सर्वव्यापी चळवळ आहे. याच चळवळीमुळे केवळ आर्थिक परिवर्तन झाले नाही तर सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिवर्तन झाले आहे. दारिद्र्या निर्मुलनासाठी आजपर्यंत सरकारने अनेक योजना राबवल्या मात्र दारिद्र्या दूर झाले नाही. विशेष करून महिलांमधील दारिद्र्या दूर झाले नाही. महिला बचत गटांच्या माध्यमातून महिला सर्वच आघाडयांवर पुरुषांच्या बरोबरीने येऊ लागल्या आहेत. त्यांच्या मध्ये जागृती होऊ लागल्या आहे. वरील परिस्थितीचा विचार करुन प्रस्तुत अध्ययनात "भंडारा जिल्ह्यातील बचत गटातील सहभागामुळे महिला सदस्यांच्या जीवनाच्या स्तरातील सुधारणा: एक समाजशास्त्रीय अध्ययन" हा अभ्यास केलेला आहे.

## प्रस्ताविक

बचत गटांच्या चळवळीचे जनक नोबेल पुरस्कार विजेते डॉ. महमंद युनूस यांनी महिलांमध्ये बचत गटांच्या माध्यमातून कमालीचा आत्मविश्वास निर्माण केला. ग्रामीण बँकेसारखी संकल्पना राबवून गरिबी निर्मुलनाचा जणू त्यांनी वसाच घेतला. आज जगभरात बचत गटांची चळवळ फोफावली आहे. १९८२ पासून बचत गट स्थापना व निर्मितीस मोठ्या प्रमाणावर वेग आला. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) हे गट आणि बँकांकडून होणाऱ्या पतपुरवठ्याची सांगड घातल्यानंतर बचतगट चळवळ व्यापक होत गेली. देशात एकुन ४० लाख बचत गट आहेत. त्यापैकी ३० लाख गटांना कर्ज व अनुदानापोटी आठ हजार कोटीची मदत शासनाने केली आहे. या वर्षी दहा हजार कोटी रूपयापर्यंत मदतीचा आकडा जाईल. विशेष म्हणजे कर्ज परतफेड प्रमाणपत्र ८६ टक्के आहे. हे प्रमाण उद्योग शेती कर्जाच्या तुलनेत कौतुकास्पद आहे. महिला बचतगट स्थापल्यामुळे ग्रामीण विभागातील महिलांना आत्मसन्मान मिळाला आहे.



महाराष्ट्रापुरते बोलायचे तर बहुतेक जिल्ह्यांमध्ये या बचत गटांचे जाळे पसरले आहे. शेतीच्या उत्पन्नातून किंवा कुटुंबाच्या पारंपारिक व्यवसायातून मिळणारा पैसा घरात खर्च होत असला तरी घरच्या बाईच्या हातात तो नसायचा. तिला तिच्या मर्जीप्रमाणे पैसे खर्च करणे किंवा कुटुंबाच्या कमाईला हातभार लावणे शक्य होत नसे. बचत गटांच्या माध्यमातून पैसा थेट तिच्या हातात गेला. पुरुषांपेक्षा स्त्रिया उत्तम व्यवस्थापक असल्यामुळे त्याचे योग्य नियोजन करुन स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांना एक पर्याय खुला झाला त्यातुनच खूप मेहनतीने खाद्यपदार्थ, उदबत्या, मेणबत्त्या, फराळ, मसाले असे विविध उद्योग महिलांनी उभे करुन स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न केला. अत्यंत गरीब परिस्थितीतून येऊन बचत गटांच्या माध्यमातून स्वत:च्या पायावर उभा राहिलेल्या महिलांच्या यशस्वी कहाण्या महाराष्ट्रामध्ये खुप सांगता येतील.

भंडारा जिल्ह्याची आर्थिक सामाजिक पार्वभुमी इतर जिल्ह्याच्या तुलनेत वेगळी आहे. त्या मुळे महिला बचत गटांची कार्यप्रणाली व त्यांच्या समोरील अळथळे यांचा भंडारा जिल्ह्याच्या पार्श्वभुमीवर अभ्यास करून त्याचा संशोधात्मक निष्कर्ष समोर मांडने खुप गरजेचे आहे.

महिला बचत गटांची आजची स्थिती व भविष्यातील संभावित धोरणात्मक वाटचाल या सर्वाचे शास्त्रीय पद्धतीने विवेचन करून एक दिशादर्शक अभ्यास सर्वांसमोर येणे गरजंचे असल्याने सदर विषयाची निवड महत्वाची ठरते.

**सारणी क्रमांक १: बचत गट सदस्यांच्या जीवनाच्या स्तरात बचत गटातील सहभागामुळे सुधारणा झाली असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| **बचत गटातील सहभागितेमुळे जीवनमानच्या स्तरात सुधारणा** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | १२४ | ९८.९ |
| सांगता येत नाही | ०१ | १.१ |
| **एकूण** | **१२५** | **१००.०** |
| Chi-Square | Df | Sig |
| 334.183 | 1 | <0.05 |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये भंडारा जिल्ह्यातील बचत गट सदस्यांच्या जीवनाच्या स्तरात बचत गटातील सहभागामुळे सुधारणा झाली असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ९८.९ टक्के बचत गट सदस्यांच्या जीवनाच्या स्तरात बचत गटातील सहभागामुळे सुधारणा झाली आहे. तसेच १.१ टक्के बचत गट सदस्यांनी बचत गट सहभागामुळे जीवनाच्या स्तरात झालेल्या सुधारणासंबंधी अनिश्चितता दर्शविली. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, बचत गटातील सदस्यांच्या जीवनाच्या स्तरात बचत गटातील सहभागामुळे झालेल्या सुधारणानूसार भंडारा जिल्ह्यातील बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ३३४.१८३; P<०.०५) फरक आहे. म्हणजेच भंडारा जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे

जीवनाच्या स्तरात सुधारणाा अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक २: जिल्ह्याची सामाजिक स्थिती सुधारण्यात महिला बचत गटाचे मोठे योगदान असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| जिल्ह्याची सामाजिक स्थिती सुधारण्यात महिला बचत गटाचे मोठे योगदान | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ११० | ८८.३ |
| नाही | ०६ | ४.६ |
| सांगता येत नाही | ०९ | ७.१ |
| **एकूण** | **१२५** | **१००** |
| Chi-Square | Df | Sig |
| 515.154 | 2 | <0.05 |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये भंडारा जिल्ह्याची सामाजिक स्थिती सुधारण्यात महिला बचत गटाचे मोठे योगदान असण्याबाबत बचत गट सदस्यांचे मत दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ८८.३ टक्के बचत गट सदस्यांच्या मते जिल्ह्याची सामाजिक स्थिती सुधारण्यात महिला बचत गटाचे मोठे योगदान आहे. तसेच जिल्ह्याची सामाजिक स्थिती सुधारण्यात महिला बचत गटाचे मोठे योगदान नसणाऱ्या व या विधानासंबंधी अनिश्चितता दर्शविणाऱ्या बचत गट सदस्यांची टक्केवारी अनुक्रमे ४.६ टक्के व ७.१ टक्के होती. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, जिल्ह्याची सामाजिक स्थिती सुधारण्यात महिला बचत गटाचे मोठे योगदान असण्यानूसार भंडारा जिल्ह्यातील बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ५१५.१५४; P<०.०५) फरक आहे. म्हणजेच भंडारा जिल्ह्याची सामाजिक स्थिती सुधारण्यात महिला बचत गटाचे मोठे योगदान आहे असे वाटणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

## निष्कर्ष

भंडारा जिल्ह्यातील बचत गट सहभागितेचा सदस्यांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव झाला असून, बचत गट सहभागितेमुळे सदस्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे. बचत गट सहभागितेमुळे जीवनाच्या स्तरात सुधारणा अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे. भंडारा जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे सदस्यांची कौटुंबिक निर्णय पद्धतीमधील सहभागितेत वाढ झाली आहे. बचत गट सदस्यांच्या सामाजिक सहभागात बचत गटामुळे वाढ झाली आहे. भंडारा जिल्ह्यातील बचत गट सहभागितेमुळे सामाजिक स्तरावर मिळणाऱ्या सन्मानात वाढ अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे. बचत गट सदस्यांचा बचत गटातील सहभागितेमुळे

आत्मविश्वास व आत्मसम्मान वाढला आहे. बचत गटामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण झाले आहे.

## संदर्भ


१) महिला व बालकल्याण शासन निर्णय, यशदा प्रकाशन पुणे.
२) मुलाणी एम.यु., (२००८), अल्पबचत नियोजन (बचत गट), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पृ. ११.
३) मुलानी, एम.यु. (२००६).'महिला स्वयंसहाय्यता बचतगट' डायमंड पब्लीकेशन पुणे –३० पेज. ५८–५९
४) चौधरी, राजेश 'महिला बचत गट हस्तपुस्तीका' चौधरी लॉ पब्लीशर्स जळगांव, पुणे. पेज ९१ ते ९३.
५) गोटे, शुभांगी (२००४). 'महिला सबलीकरण स्वरूप व समस्या' वरद पब्लीकेशन औरंगाबाद पेज नं. ६५ –८५.